**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६१४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ६६ /सन २०१९-२०
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १४/१०/२०१९

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबिवली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२६** वी बैठक दिनांक **२०/०९/२०१९** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन पाणथळ तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २६ वी मासिक बैठक दि.२०/०९/२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठकीत घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी दौंड | विभागीय आयुक्त कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई. |
| २ | श्री. एन वासुदेवन | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ३ | श्री. सिध्दराम सालीमठ, | उप.आयुक्त(महसूल) कोकण विभाग | विभागीय आयुक्त कोकण विभाग |
| ४ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ५ | श्री. डी. आर. पाटिल | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ६ | श्रीमती गीता पवार | सहाय्यक वनसंरक्षक | मुंबई कांदळवन संधारण घटक |
| ७ | डॉ. सुनिल लहाने | अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर | मिरा भाईंदर महानगरपालिका |
| ८ | श्री. डी.एस. चव्हाण | उप जिल्हाधिकारी, पालघर | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| ९ | श्री. अधिक पाटील | तहसिलदार ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालय |
| १० | श्री. डि आर. पाटिल | सिडको प्रतिनिधी | सिडको |
| ११ | श्री. विनोद पुन्शी | प्रेसिडेंट | नवीमुंबई एन्व्हा. प्रीझ. सोसायटी |
| १२ | श्री. प्रमोद पाटिल | प्रतिनिधी | सिडको |
| १३ | श्री. डी. एम. बनसोडे | पोलिस निरिक्षक | ठाणे ग्रामीण |
| १४ | डॉ. अश्विनी पाटिल | SDPO वसई, पालघर | एस.पी. पालघर |
| १५ | श्री. महेश इंगळे | अधिक्षक लँन्ड रेकॉर्ड | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| १६ | श्री. दत्तात्रय नवले | उप विभागीय अधिकारी पनवेल | |
| १७ | श्री. अनिल प्र. गंभीर | पोलिस निरिक्षक, रत्नागिरी | |
| १८ | श्रीमती पद्मजा चव्हाण | ए.सी.पी. ठाणे शहर | |
| १९ | श्री. अशोक गिते | पश्चिम मुंबई नगर भूमापन अधिकारी | |
| २० | श्री. राजेंद्रकुमार परदेशी | पोलिस निरिक्षक, रायगड | |
| २१ | श्री. महेंद्र मगन लांडगे | लिपिक भिवंडी | |

**बैठकीत अनुपस्थित सदस्य.**

१. संचालक पर्यावरण, पर्यावरण विभाग

२. वसई-विरार, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी

३. डॉ. महेश शिंधीकर, पाणथळ तज्ञ

| अ. क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांच्या दि.२९.६.२०१९ रोजीच्या अहवालानुसार मौजे दस्तान नोड, ता. उरण येथील जागेत दास्तान फाटा JNPT चे १२.५% चे प्लॉट तयार करण्याचे काम चालू आहे. तसेच दस्तान फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम चालू आहे.<br>• तसेच सदरची जागा वेटलॅन्ड नसून तेथे कांदळवनही आढळून आलेले नाही. अर्जदार यांनी तक्रारीत नमूद केलेले ठिकाण हे मौजे जासई, ता. उरण या गावातील क्षेत्र आहे. त्यानुसार MRSAC नागपूर यांचेकडील प्राप्त नकाशानुसार सदरची जागा कांदळवन अथवा वेटलॅन्ड जागा नसल्याचे दिसून येत आहे. MRSAC यांचेकडील नकाशामध्ये कांदळवन नसल्याने सदर प्रकरणी गुगल ईमेज तपासणी केलेल्या नाहीत.<br>• त्या अनुषंगाने समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या अहवालानुसार तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी रायगड |
| २ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | • समितीने FIR दाखल करण्याबाबत SDO व त्या वरील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत FIR दाखल करण्याच्या सुचना दिल्या आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवरील भराव केल्यामुळे दंडाची रक्कम आणि Restoration साठी लागणाऱ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन जागेवर कांदळवन लागवडीची कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीने दिले.<br>• सदस्य सचिव – याबाबत FIR दाखल केले आहेत. परंतु मागील बैठकीत मा. आयुक्त यांनी असे निर्देश दिले होते की, आपल्या Environment Protection Act नुसार SDO तसेच MPCB च्या अधिकाऱ्यांना FIR आणि | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चार्जशिट दाखल करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार त्याच्यामध्ये बदल करण्याचे सांगितले होते.<br>• जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींनी याबाबत सदर जागेवर भराव करण्यात आला असून सर्व्हे करुन भराव करण्यात आला होता. अहवालाची प्रत SDO कडून घेण्यात येईल.<br>• तसेच याबाबत FIR दाखल केलेला आहे. संबंधित संस्थेशी लेखी अहवाल घेऊन अहवाल सादर करण्यात येईल.<br>• सदस्य सचिव – पुढील बैठकीत अहवाल सादर करण्यात यावा असे सांगितले. | |
| ३ | श्री. धिरज परब: - भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • या तक्रारी संदर्भात समितीने मेरी टाईम बोर्ड बांधण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात आल्या असतील त्या संबंधीचा सर्वे नंबर, झालेला खर्चयाबाबतचा सविस्तर अहवाल देण्याच्या सूचना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सांगितले.<br>• तहसिलदार ठाणे – जेसलपार्कखाडी याबाबत FIR दाखल करण्यात आला आहे. याबाबत जेट्टीचे बांधकाम चालू आहे. याबाबत १०/०८/२०१६ रोजी ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. २०१७ ला चार्जशिट दाखल केली. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि तहसिलदार ठाणे |
| ४ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | | |
| ५ | श्री. स्टॅलीन डी – दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • समितीने तक्रारदार श्री. स्टॅलीन डी यांच्या सोबत संपर्क साधून सदर जागेवरील डेब्रिज हटविवून १५ दिवसात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट यांना दिल्या आहेत.<br>• तसेच सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना देखील समितीने मुंबई महानगरपालिकेला दिल्या.<br>• जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या प्रतिनिधींनी याबाबत चार्जशिट दाखल केली आहे त्याबाबतचा तपास चालू आहे असे सांगितले. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • समितीने या तक्रारी बाबत सॉल्ट पॅन आयुक्तांना सदरच्या तक्रारी बाबत निदर्शनास आणून देऊन सदर तक्रारीबाबत योग्य ती कार्यवही करण्याचे निर्देश दिले आहेत. | |
| ६ | Well Wisher and Environment activist दि.२५.०३.२०१९ Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dis. Thane. | • या तक्रारी संदर्भात तहसलिदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर जमिनीवर भातशेतीचे खाचरे दिसून आले. तथापी सदर स.नं. चे बाजूस खार फुटीची विरळ प्रमाणात झाडे असल्याचे दिसून येते तसेच डेब्रिज भरणी केलेल्या जमिनीमध्ये मॅग्रोज प्रजातीच्या झाडांचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने सदरची तक्रार बंद करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे तहसिलदार ठाणे अहवाल प्राप्त |
| ७ | श्री. स्टॅलिन डी दि.१८.०३.२०१९ Continuous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada Ghodbunder road by squarefeet Group. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांनी स्थळ पाणी केली असून या ठिकणी महानगरपालिकेच्या परवानगीने काम चालू आहे व काही ठिकाणी इमारतीच्या बांधकामे चालू आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणी पाणथळ आहे किंवा कसे याबाबत वन विभागाकडून अभिप्राय घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना भाईंदरपाडा हे क्षेत्र वेटलॅन्ड क्षेत्रात येते की नाही याबाबत तपासणीसाठी आवश्यक GPS Location सदस्य सचिवांना तपासणीसाठी देण्याच्या सूचना दिल्या.<br>• तहसिलदार ठाणे यांनी सदर ठिकाणी स्थळपाहणी करण्यात आली आहे व त्याप्रमाणे अहवाल सादर केला आहे. ५० मीटर बफर झोनमध्ये बांधकाम करण्यात आले आहे.<br>• समितीने या तक्रारीबाबत घेतलेल्या परवानग्या तपासण्यासाठी ठाणे महानगरपालिका,ACP, पोलीस SDO यांचा एकत्र स्थळ पहाणी करुन नियमाच उल्लंघन झाल असेल त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ८ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९ Drying up of Panje Wetland in Uran & debris | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी MRSAC नकाशाच्या पाहणी नुसार बेनखल येथे पाणथळ असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी असलेले डेब्रिज काही प्रमाणात काढण्यात | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| | dumping in Bhenkhal<br>Wetland atlas नुसार पाणजे वेटलँड हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही. | आले आहे असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने उर्वरित डेब्रिज काढण्याच्या सूचना सिडको आणि SDO पनवेल यांना दिल्या व त्याबाबतचा अहवाल १५ दिवसात सदस्य सचिवांना देण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच ज्या ज्या पाणथळ जागा आहेत त्या सिडकोने नोटिफाय करुन घ्यावे. | |
| ९ | श्री. स्टॅलिन डी :-<br>दि.२७.०६.२०१९<br>Destruction of Wetland by CIDCO | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार रायगड आणि सिडको यांनी स्थळ पहाणी केली असून सिडको यांच्या प्रतिनिधींनी ही तक्रार JNPT अंतर्गत येत असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सिडको यांना योग्य ती कार्यवाही करुन अहवाल तहसिलदार रायगड यांच्याकडून समितीस सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• सदर जागा हि एअरपोर्ट विभागाची असून तेथे पाणथळ नसल्याचे SDO पनवेल यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारी बाबतचा अहवाल वन विभागास सादर करावा असे निर्देश [illegible] दिले. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| १० | श्री. समिर सुभाष वर्तक आणि मॅकेन्झी डांबरे दि. २२/०२/२१९ भुईगाव येथील पाणथळ जागेवर तिवरांची कत्तल होऊन अतिक्रमणाबाबत शासनाच्या उदासीन धोरणाबाबत बेमुदत उपोषणाबाबत. | • तलावाची माती बांधावर टाकल्याबाबतचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच रेमंड रॉक करवाले यांच्या विरुध्द SDO वसई यांच्याकडे क्र.८/२०१७ रोजी गुन्हा दाखल केला आहे.<br>• सदर तक्रारीचा पाठपुरावा करुन SDO वसई यांच्या मार्फत अहवाल सादर करावा असे निर्देश समितीने जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनिधींना दिले. | जिल्हाधिकारी पालघर |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.